
# दूरस्थ शिक्षण केंद्र

# श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठ



सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू रोड,
सांताक्रुझ(पश्चिम), मुंबई - ४०० ०४९.
दूरध्वनी : २६६०८१७६ / २६६०९८२९ / २६६०८१९८ / २६६ ७७५८
फॅक्स : २६६० ४७५९
ईमेल : cde@sndt.ac.in  वेबसाइट : www.sndt.ac.in

## दूरस्थ शिक्षण केंद्रा विषयी....

श्री. ना. दा.ठा. महिला विद्यापीठाची स्थापना भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी सन १९१६ मध्ये केली. महिलांचा विकास आणि सबलीकरणाची उद्दिष्टे असणाऱ्या या विद्यापीठाला सन १९५१ मध्ये वैधानिक मान्यता मिळाली असून या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र सबंध भारतभरात आहे.

श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाचाच एक भाग म्हणून पारंपारिक शिक्षण पद्धती बरोबरच १९७९ नंतर दूरस्थ शिक्षण विभाग उच्च शिक्षणाच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणासाठी कार्यरत आहे.

हे केंद्र प्रमाणपत्रे, पदविका आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम विविध विषयात विद्यार्थीनींसाठी उपलब्ध करून देतो. दहावी अथवा बारावी इयत्ता उत्तीर्ण नसलेल्या महिलांमध्ये शिक्षणाकरीता जागरूकता निर्माण करून त्यांना पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यवसायभिमुख शिक्षण देण्याचे प्रयत्न दूरस्थ शिक्षण केंद्र करीत आहे. मागील ३४ वर्षांमध्ये ३ लाख महिलांनी या शिक्षणपद्धतीचा लाभ घेतला आहे. या शिक्षणाचा फायदा घेऊन आपल्या जीवनात यशस्वी झाल्या आहेत. मागील वर्षी १० हजारापेक्षा अधिक महिलांनी दूरस्थ शिक्षण केंद्राच्या वेगवेगळ्या अभ्यास शाखांमध्ये प्रवेश नोंदविला होता.

## उद्दिष्टये:

- ✓ उच्च शिक्षणाद्वारे महिलांचे सक्षमीकरण करणे.
- ✓ नोकरदार महिलांना त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक वृद्धीसाठी आजीवन शिक्षणाची संधी उपलब्ध करणे.
- ✓ महिलांसाठी शिक्षणाचे एक प्रमुख स्त्रोत म्हणून कार्य करणे.
- ✓ शिक्षणाद्वारे महिलांच्या व्यक्तीमत्व विकासास हातभार लावणे.
- ✓ स्पर्धात्मक युगाशी समायोजन साधण्यासाठी विविध कौशल्य आत्मसात करण्यास मदत करणे.

## चालू शैक्षणिक उपक्रम

### पारंपारिक अभ्यासक्रम

- **पदवी अभ्यासक्रम कला शाखा (बी.ए.)**
  इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि संगीत

- पदवी अभ्यासक्रम वाणिज्य शाखा (बी.कॉम.)
- पदव्युत्तर अभ्यासक्रम कला शाखा (एम्.ए.)
  इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि संगीत
- पदव्युत्तर अभ्यासक्रम वाणिज्य शाखा (एम्.कॉम.) (ऑफलाईन)
- पदव्युत्तर अभ्यासक्रम वाणिज्य शाखा (एम्.कॉम.) (ऑनलाईन)

## व्यावसायिक शिक्षण

### पदव्युत्तर पदविका

१) **पदव्युत्तर पदविका 'मानवी संसाधन व्यवस्थापन'**

**(P. G. Diploma in Human Resource Management)**

उद्दिष्टे :

✓ व्यवस्थापनाच्या कार्यात्मक क्षेत्रांची माहिती अवगत करून देणे.

✓ नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलांना एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक उपक्रमात समाविष्ठ होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

✓ महिला व्यवस्थापकांना त्यांच्या कार्यात सातत्य टिकविण्यासाठी व्यावसायिक शिक्षण पुरविणे.

✓ विद्यार्थीनींमध्ये जागतिक व्यापार व औद्योगिक जगताशी समन्वय साधण्याची क्षमता निर्माण करणे.

पात्रता :

✓ कोणत्याही विद्यापीठाची मान्यताप्राप्त पदवी प्राप्त महिला.

✓ कालावधी : १ वर्ष

२) **पदव्युत्तर पदविका 'बाल्यावस्था पूर्व संगोपन शिक्षण'**

**(P. G. Diploma in Early Childhood Care Education)**

उद्दिष्टे :

✓ बालसंगोपनाचे कौशल्य व अभिवृत्ती आत्मसात करणे.

✓ बालकाला समजूत घेण्याचे कौशल्य आत्मसात करणे.

✓ बालसंगोपन शिक्षणाबाबतचा समकालिन व जागतिक प्रवाह समजून घेणे.

<u>पात्रता</u> :

बी.ए., बी.कॉम., बी.एससी., मानवी विकास शास्त्र /बी.एससी. (बाल्यावस्था पूर्व शिक्षक शिक्षण) बी.एससी. (समुपदेशन विकास) (B,Sc. Development Counseling)

<u>कालावधी</u> : १ वर्ष ६ महिने

३) **पदव्युत्तर पदविका 'शालेय समुपदेशन'**
**(P.G. Diploma in School Counseling)**

<u>उद्दिष्टे</u> :

✓ कुमारावस्थेतील मुलांच्या गरजा आणि समस्या याबद्दल आकलन क्षमता विकसित करणे.

✓ मार्गदर्शन व समुपदेशन कला अवगत करणे.

✓ कुमारावस्थेतील मुलांचे मानसशास्त्र व समायोजनाचे मानसशास्त्र याबाबत माहिती मिळवणे.

✓ वर्तनशास्त्राबाबत संशोधन व सांख्यिकीय उपागम/ दृष्टिकोन जाणून घेणे.

✓ शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यावसायिक उपलब्ध संधी विषयी जागृती करणे.

<u>पात्रता</u> :

✓ बी.ए., बी.कॉम., बी.एससी., बी.एससी (अर्ली चाईल्ड एज्युकेशन), बी.एससी. (डेव्हलपमेंट कॉन्सलिंग), बी.एड. आणि एम्.एड (किमान दोन पेपर मानसशास्त्र विषयाचे असलेल्या पात्र महिला)

✓ मानसशास्त्र विषय नसलेल्या विद्यार्थिनींनी श्री. ना. दा. ठा. विद्यापीठाच्या मार्गदर्शन व समुपदेशन अभ्यास विषयात प्रमाणपत्र कोर्स पूर्ण केला असावा.

<u>कालावधी</u> : २ वर्ष + ३ महिने (इंटर्नशिप)

## प्रमाणपत्र अभ्यासक्रम

### १) प्रमाणपत्र अभ्यासक्रम 'मार्गदर्शन आणि समुपदेशन'

उद्देश्य :-

१) विद्यार्थीनींना मार्गदर्शन व समुपदेशन विषयातील सिध्दान्त व व्यवहार यांचा परिचय करून देणे.

२) विद्यार्थीनींना समुपदेशनाचे प्रकार समजावून देणे.

३) समुपदेशनातील विविध उपागम (दृष्टीकोण) समजावून देणे.

४) समुपदेशनाशी संबंधीत विविध बाबी संदर्भात दृष्टीकोण विकसित करणे.

५) विद्यार्थीनींना दूरस्थ शिक्षण केंद्रातर्फे (श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठ) चालविल्या जाणाऱ्या ''व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम - समुपदेशन'' या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी तयार करणे.

पात्रता : बारावी उत्तीर्ण / UET (विद्यापीठ प्रवेश परीक्षा उत्तीर्ण)

कालावधी : ६ महिने

### २) प्रमाणपत्र अभ्यासक्रम "Basic of Diet Therapy'

उद्देश्य :

१) विद्यार्थीनींमध्ये आहार व पोषण या संबंधी जागृती करणे.

२) आजारामुळे झालेले शरीरावरील परिणाम व आजारातील पोषक आहाराच्या गरजा याबाबत आकलन क्षमता विकसित करणे.

३) विविध आजारामध्ये आवश्यक आहाराबाबत माहिती देणे.

४) वजन व्यवस्थापनाबाबत माहिती देणे.

पात्रता : दहावी उत्तीर्ण / UET (प्रवेश परीक्षा उत्तीर्ण)

कालावधी : ९ महिने

### ३) प्रमाणपत्र अभ्यासक्रम 'स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला प्रतिनिधींचे नेतृत्व अभ्यासक्रम'

उद्देश्य :-

१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाचे ध्येय साध्यासाठी विकास आराखडा तयार करण्यासाठी मदत करणे.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यास मदत.

३) स्थानिक गरजांच्या परिपुर्तीसाठी पंचायत/ नगरपालिका शासनाचे नियोजन तसेच निर्णयाची अंमलबजावणी व देखरेख.

४) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध स्तरांवरील निर्धारित कार्यपध्दतीत सुधार आणि क्षमतेत वाढ.

पात्रता : वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला लोकप्रतिनिधी, लोक प्रतिनीधी बनु इच्छीणारी कोणतीही महिला.

प्रवेशासाठी कोणतीही शैक्षणिक पूर्व अट नाही.

कालावधी : ६ महिने

माध्यम : मराठी माध्यम

## व्यावसायिक अभ्यासक्रम आणि रोजगाराच्या संधी

- **पदव्युत्तर पदविका 'बाल्यावस्था पूर्व शिक्षण'**
  **(PG Diploma in Early Childhood Education)**

✓ सरकारी, खाजगी, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील शाळांमध्ये रोजगार संधी

✓ सरकारी स्तरावर शिक्षक या नात्याने कार्य करू शकाल.

✓ पूर्व प्राथमिक स्तरावर शिक्षक/मुख्याध्यापक या पदावरील रोजगार संधी.

✓ स्वतःचे नर्सरी स्कूल सुरू करू शकता.

✓ स्वतःचे डे. केअर सेन्टर सुरू करू शकता.

- **पदव्युत्तर पदविका 'मानवी संसाधन व्यवस्थापन'**
  **(PG Diploma in Human Resource Management)**

✓ खाजगी/सार्वजनिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी.

✓ स्वतःचा व्यवसाय (फर्म) सुरू करता येऊ शकतो.

✓ वर्तमान नोकरी व्यवसायात पदोन्नतीसाठी उपयुक्त.

✓ व्यवसाय संधी उपलब्ध करणारी संस्था चालवू शकता.

- **पदव्युत्तर पदविका 'शालेय समुपदेशन'**
  **(PG Diploma in School Counseling)**

✓ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शाळांमध्ये समुपदेशक म्हणून रोजगार संधी

✓ १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे समूपदेशन करण्याचे कार्य करू शकता.

- **मार्गदर्शन आणि समुपदेशन प्रमाणपत्र अभ्यासक्रम:**
  **(Certificate Course in Guidance & Counseling)**

✓ प्राथमिक शाळांमध्ये स्वतंत्र समुपदेशक म्हणून कार्य करण्याची संधी.

✓ खाजगी समुपदेशन संस्था स्थापन करू शकता.

- **बेसिक डाएट थेरपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम**
  **(Certificate Course in Basics of Diet Therapy)**

✓ दवाखाना, स्वास्थ विभाग, व्यायामशाळा, वजन व्यवस्थापन, या विभागांमध्ये आहारतज्ज्ञ म्हणून कार्य करू शकता.

## सर्व व्यावसायिक कोर्सेससाठी

✓ शिक्षणाचे माध्यम इंग्रजी (विद्यार्थीनी हिंदी, मराठी, गुजराती विषयात परीक्षा देऊ शकतात)

✓ उपस्थिती : ७५% उपस्थिती आवश्यक आहे.

✓ संपर्क व्याख्याने : शनिवार / रविवार

## विद्यार्थिनींसाठी सुविधा

**प्रवेश आणि परीक्षा प्रक्रिया**

✓ प्रवेश ऑनलाईन पध्दतीने घेता येतील ( www.sndt.ac.in).

✓ मागणीनुसार प्रवेश अर्ज घरपोच पाठविण्याची सुविधा (काही कोर्सेससाठी)

✓ महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात सर्वत्र प्रवेश केंद्रे व परीक्षा केंद्रे उपलब्ध

✓ विद्यार्थिनी मराठी, हिंदी, गुजराती आणि इंग्रजी माध्यमातून परीक्षा देऊ शकतील.

**अनुदेशनाचे माध्यम:**

✓ <u>छापिल अभ्यास साहित्य</u>
इंग्रजी, मराठी हिंदी आणि गुजराती भाषांमध्ये स्वयं-अध्ययनाची साधने उपलब्ध.

- ✓ <u>रेडिओ:-</u>
  वेब रेडिओ वरील व्याख्याने (http://sndt.ac.in)
  ग्यानवाणी F.M. रेडिओ 105.6 MHz मुंबई वरील व्याख्याने
- ✓ <u>ऑडिओ आणि व्हिडिओ:-</u>
  निवडक अभ्यासक्रमाच्या व्याख्यानाच्या CD's उपलब्ध
- ✓ <u>संपर्क व्याख्यानमाला:-</u>
  महाराष्ट्र व गुजरात राज्यातील निवडक अभ्यास केंद्रावरती उपलब्ध

**अतिरिक्त सुविधा**

- ✓ विद्यापीठाच्या ग्रंथालयात सभासदत्व उपलब्ध.
- ✓ ई-पत्रव्यवहार (e-mail), पत्राद्वारे, फोनवर आणि वैयक्तिक मार्गदर्शन
- ✓ मागील वर्षाच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध.

# सुवर्ण संधी

## विद्यापीठ प्रवेश परीक्षा (कला / वाणिज्य)

१८ वर्षे पूर्ण झालेल्या व शालेय शिक्षण अपूर्ण असलेल्या महिलांना आमच्या विद्यापीठाची 'प्रवेश परीक्षा' उत्तीर्ण झाल्यावर पदवी अभ्यासक्रमासाठी नोंदणी करता येते.

**प्रवेश परीक्षेची वैशिष्ट्ये:**

- ✓ ही प्रवेश परीक्षा कला आणि वाणिज्य शाखेसाठी स्वतंत्रपणे घेतली जाते.
- ✓ या प्रवेश परीक्षेसाठी प्रत्येकी १०० गुणांचे चार पेपर्स असतात.
- ✓ ही प्रवेश परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते (डिसेंबर आणि मे)
- ✓ ही प्रवेश परीक्षा १२वी च्या परीक्षेस समकक्ष नाही.
- ✓ विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षेचे मूल्यांकन स्वतंत्रपणे केले जाते.
- ✓ प्रवेश परीक्षा इंग्रजी, मराठी, हिंदी आणि गुजराती या चार भाषांमधून घेण्यात येते.
- ✓ चार ही विषयांचे अभ्याससाहित्य इंग्रजी, हिंदी, मराठी व गुजराती माध्यमातून.